|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/दी.स.२९/९०७/२०२१ दिनांक: २९.०४.२०२१

प्रति,

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र**
**विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य तसेच**
**मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक........**

**विषय**:-कबचौउमविच्या एकोणतिसाव्या दीक्षांत समारंभाची Link सर्व संबंधितांना व विद्यार्थ्यांना उपलब्ध करुन देणेबाबत .....

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यांत येते की, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा **एकोणतिसावा** दीक्षांत समारंभ **श्री. भगत सिंह कोश्यारी, मा. राज्यपाल तथा कुलपती महोदयांच्या** अध्यक्षतेखाली **सोमवार, दिनांक ०३ मे, २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता** विद्यापीठाच्या मा. अधिसभा सभागृहात **ऑनलाईन पध्दतीने** आयोजित करण्यात आला आहे. मा. राज्यपाल तथा कुलपती महोदय या समारंभात ऑनलाईन सहभागी होऊन दीक्षांत भाषण करणार असून, **प्रमुख पाहुणे** म्हणून **मा.उदय रवींद्र सामंत, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री (महाराष्ट्र राज्य)** हे देखील सदर समारंभात ऑनलाईन सहभागी होणार आहेत.

विद्यापीठाच्या एकोणतिसाव्या दीक्षांत समारंभाविषयीची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यांत येत आहे. सदर दीक्षांत सोहळ्याचे थेट प्रक्षेपण विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावरुन दिनांक ०३ मे, २०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता प्रक्षेपित करण्यांत येणार आहे. तरी आपणांस कळविण्यांत येते की, सदर दीक्षांत सोहळ्याची link आपल्या महाविद्यालयातील/परिसंस्थेतील सर्व संबंधितांना तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या मेल-आयडीवर उपलब्ध करुन देऊन द्यावी, जेणेकरुन संबंधितांना दीक्षांत सोहळ्याबाबत अवगत होऊन ते सदर ऑनलाईन सोहळा पाहू शकतील.

तरी उपरोक्तसंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

आपला स्नेहांकीत,

(भ. प्र. पाटील)
**संचालक,**
परीक्षा व मूल्यमापन मंडळ